# अंबरनाथ नगरपरिषदेला सर्वोत्कृष्ट नगरपरिषदेचा पुरस्कार







प्रथम नगरविकास दिनाचे औचित्य साधून गुरुवार दि.४ मे २०१७ रोजी महाराष्ट्रामध्ये सर्वोत्कृष्ट नगरपरिषद म्हणून आणि पुणे व कोकण विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये आयोजित कार्यक्रमात माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते नागरी गौरव पुरस्कार अंबरनाथ नगरपरिषदेला प्रदान करण्यांत आला.





यावेळी मा.नगराध्यक्षा प्रज्ञा बनसोडे, मा.उपनगराध्यक्ष श्री.राजू वाळेकर आणि मुख्याधिकारी श्री.गणेश देशमुख यांनी पुरस्कार स्विकारला. यावेळी बांधकाम सभापती श्री. सदाशिव पाटील आणि नगरपरिषद अधिकारी वर्ग उपस्थित होता.




महाराष्ट्र राज्य **नगरविकास विभाग सचिव श्रीम.मनिषा पाटणकर-म्हैसकर** यांचेबरोबर आपला आनंद व्यक्त करताना अंबरनाथ नगरपरिषदेच्या मा.नगराध्यक्षा श्रीम.प्रज्ञा बनसोडे, मुख्याधिकारी श्री. गणेश देशमुख, इतर पदाधिकारी व अधिकारीवर्ग.




अंबरनाथ नगरपरिषदेला प्रथमच अशा प्रकारचा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण अंबरनाथमध्ये आनंदाचे वातावरण आहे.